सिव्हील अपील क्र. २५९८/१९८८,
मे. शांतीस्टार विरुद्ध गोटामे व इतर या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दि. १७.११.१९९५ रोजीच्या निर्णयानुसार दि. ३१ जानेवारी, १९९० चे आदेश कायम केले त्याबाबतची कार्यवाही - शासन नामनिर्देशित व्यक्तींना प्रत्यार्पित करावयाच्या ५% सदनिका.

---

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्र. नाजक १०९५/[६१८२]/नाजकधा-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ ऑक्टोबर, १९९७.

**वाचा :** १] शासन पत्र क्रं. एसएसएस १०९२/[५३२०]/का. १३, दि. १२ मे, १९९३
२] अवमान याचिका क्र. १३९/९५ या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दि. १७.११.१९९५ रोजी दिलेला निवाडा.

**प्रस्तावना :**

मे. शांतीस्टार विरुद्ध गोटामे व इतर या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दि. ३० जानेवारी, १९९० रोजी दिलेल्या निकालात कांही मार्गदर्शक निर्णय दिलेले होते. त्यापैकी एक मार्गदर्शक निर्णय पुढीलप्रमाणे आहे :-

कलम २० आणि २१ खाली मंजूर केलेल्या दुर्बल घटक घरबांधणी योजने अंतर्गत शासन नामनिर्देशित व्यक्तींना पूर्वनिर्धारित दराने वितरित करावयाच्या सदनिकांची टक्केवारी ५% पुरती मर्यादित ठेवावी.

२. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयाचा फेरविचार करावा असे प्रतिज्ञापत्र राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयामध्ये मार्च, १९९०, ऑगष्ट, १९९१ आणि सप्टेंबर, १९९५ मध्ये सादर केले होते. सदर प्रतिज्ञापत्रामध्ये शासन नामनिर्देशित व्यक्तींना वितरित करावयाच्या सदनिकांची टक्केवारी पूर्ववत १०% करावी, अशी विनंती प्रतिज्ञापत्रामध्ये केली होती.

३. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान होऊ नये म्हणून राज्य शासनाने दि. २१.५.१९९३ च्या पत्रामध्ये पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व सक्षम प्राधिकाऱ्यांना दिल्या होत्या.

Scanned with CamScanner

होईपर्यन्त शासन नामनिर्देशित व्यक्तींसाठी ५% [illegible]

राखून ठेवण्याचा हक्क कायम ठेवावा.

ब] प्रत्यक्ष ५% सदनिकाचे वितरण शासन नामनिर्देशीत व्यक्तींना करावे.

क] उर्वरित ५% सदनिका सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यन्त राखून ठेवण्याचे हमीपत्र विकासकाराकडून घ्यावे.

४. अवमान याचिका क्र. १३९/९५ या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दि. १७.११.९५ रोजी दिलेल्या निकालामध्ये शासनाने दाखल केलेली प्रतिज्ञापत्रे फेटाळून दि. ३० जानेवारी, १९९० चा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे एक महिन्याचे आंत पालन करावे, असा निकाल दिला.

५. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. १७.११.१९९५ च्या निर्णयाच्या अनुषंगाने दि. ३० जानेवारी, १९९० किंवा त्यानंतर कलम २० आणि २१ खाली मंजूर केलेल्या योजनेमध्ये शासन नामनिर्देशित व्यक्तींना प्रत्यार्पित करावयाच्या सदनिकांचे प्रमाण ५% पुरते मर्यादित ठेवून विकासकाराकडे राखून ठेवलेल्या ५% सदनिका खुल्या बाजारात विक्री करण्यासाठी परत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

निर्णय :

नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमाच्या कलम २० आणि २१ खाली दि. ३० जानेवारी, १९९० रोजी किंवा त्यानंतर मंजूर केलेल्या दुर्बल घटक घरबांधणी योजने अंतर्गत ज्या विकासकारांनी विकसित केलेल्या सदनिकांपैकी ५ टक्के सदनिका शासन नामनिर्देशित व्यक्तींना वितरित करण्यासाठी प्रत्यार्पित केल्या असतील आणि उर्वरित ५% सदनिका शासन नामनिर्देशित व्यक्तींसाठी राखून ठेवण्याचे हमीपत्र

....३

Scanned with CamScanner

संबंधित सक्षम प्राधिकारी यांच्याकडे दाखल केले असेल तर आता राखून ठेवलेल्या ५४ सदनिका खुल्या बाजारात विक्री करण्यासाठी उक्त पत्रातून कळविण्याचा निर्णय शासनाने रद्द केला आहे.

सोबत दि. २१,१, ९० किंवा त्यानंतर कलम २० खाली मंजूर केलेल्या इतर धारक धारकांच्या योजनेमधून ५४ सदनिका निर्धारित करण्यासाठी शासनाकडे ठेवून उर्वरित सदनिका खुल्या बाजारात विक्री करण्यासाठी जमीनधारक/विकासकांना परत कराव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

[ अे. आर. दलवाई ]
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
१. राज्यपालांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. मंत्री [नाजकधा] यांचे खाजगी सचिव,
४. सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव,
५. [illegible] यांचे खाजगी सचिव,
६. सर्व राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,
७. मुख्य सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग,
९. विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नाशिक व नागपूर,
१०. अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, नागरी जमीन कमालधारणा, मुंबई, पुणे, ठाणे, ~~xxxxxxxx~~ व नागपूर,
११. उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, नागरी जमीन कमालधारणा, उल्हासनगर, सांगली, कोल्हापूर व सोलापूर,
१२. सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
१३. सह सचिव, [नाजकधा] गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
१४. उप सचिव, [कॅप्टन रोखा], गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
१५. सर्व अधिकारी व कार्यासने, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
१६. निवड नस्ती / नाजकधा - १,

अप्पर जिल्हाधिकारी / उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, नागरी जमीन कमाल धारणा यांना मंत्रालयाद्वारे निर्गमित करण्यात यावे.

Scanned with CamScanner